स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

Maharashtra Village Social Transformation Foundation

CIN No. U74999MH2017NPL289558

डॉ.उमाकांत दांगट, भा.प्र.से (से.नि.)
मुख्य कार्यकारी अधिकारी

जाक्र.मग्रासापअ /११२०२६ /मुकाअ/उपजि./389
ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन,
दुसरा मजला,१५, ठाकरसी हाऊस,
मुंबई पोर्ट ट्रस्ट बिल्डिंग,
जे.एन. हेरेडिया रोड, बलार्ड इस्टेट, फोर्ट,
मुंबई, महाराष्ट्र ४००००१

दिनांक:-१६/११/२०२६

-निविदा मागणी सूचना-

ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (VSTF) मार्फत आकांक्षित व शेतकरी आत्महत्याप्रवण ४ जिल्ह्यांमध्ये (सोलापूर, लातूर, गडचिरोली व धाराशिव) १० तालुक्यांतील निवडक ३० समुदाय आधारित संस्थांच्या शाश्वत विकासासाठी **'ग्रामीण उपजीविका बळकटीकरण प्रकल्प'** राबवण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत सीबीओ संचालक मंडळ, कार्यकारी समिती व सदस्यांच्या क्षमता बांधणीसाठी सुलभ व व्यावहारिक **माहिती, प्रशिक्षण व संवाद (IEC) साहित्य व मार्गदर्शक पुस्तिका** तयार करावयाची आहे. यास्तव, **वैयक्तीक तज्ञ सल्लागार यांच्याकडून** ई-मेल द्वारे ऑनलाईन पद्धतीने **तांत्रिक प्रस्ताव (Technical Proposal)** आणि **वित्तीय प्रस्ताव (Financial Proposal)** खालील अटी शर्तीस अधिन राहून आमंत्रित करण्यात येत आहेत.

१. कामाची व्याप्ती (Scope of Work)

- **वैयक्तिक तज्ञ सल्लागाराला** समुदाय आधारित संस्थांच्या (CBO) ध्येय-धोरणांनुसार माहिती, शिक्षण आणि संवाद (IEC) मॅन्युअल तयार करावे लागेल.
- माहिती पुस्तिकेत प्रामुख्याने खालील ४ घटकांचा समावेश असावा: १. संस्थात्मक प्रशासन, वैधानिक व आर्थिक बाबींचे मार्गदर्शन. २. व्यवसाय मार्गदर्शन (SOPs, भाडेदर आकारणी, मार्केट लिंकेज). ३. शासकीय योजना व त्यांचे ऑनलाईन अर्ज/QR कोड यांचे डिजिटल दुवे संकलन. ४. प्रशिक्षण घेण्यासाठीची पद्धत व वेळापत्रक.
- मॅन्युअलची भाषा CBO संचालक व तळागाळातील सदस्यांना समजेल अशी सोपी, सुलभ आणि चित्रमय मराठी असावी.
- काम एकूण ६ टप्प्यांत पार पाडावे लागेल, ज्यामध्ये ४ जिल्ह्यांतील (सोलापूर, लातूर, गडचिरोली, धाराशीव) ३० संस्थांचे गरज मूल्यांकन (Need Assessment) आणि वापरकर्त्यांची अंतिम स्वीकृती/पडताळणी घेणे बंधनकारक असेल.

२. पात्रता निकष (Eligibility Criteria)

- दरपत्रक सादर करणा-या तज्ञ सल्लागारास ग्रामीण विकास, कृषी, FPO/CBO क्षमता बांधणी व IEC साहित्य निर्मितीचा किमान ५ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असावा.
- सुलभ मराठी भाषेत उच्च दर्जाचे प्रशिक्षण साहित्य तयार करण्याचे लेखन कौशल्य असावे.

३. कराराचा कालावधी (Timeline)

- हे काम **७ आठवड्यांच्या (४९ दिवस)** कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असेल.

४. मानधन आणि पेमेंटचे टप्पे (Professional Fees & Payment Milestones)

- या कामासाठी संपूर्ण एकरकमी प्रस्तावित किंमत (Fixed Price / Lump-sum Cost) वित्तीय प्रस्तावात नमूद करावी. दरांमध्ये शासकीय कर (Taxes) आणि नियमानुसार प्रवास खर्च (Out of Pocket Expenses) समाविष्ट असावेत. या कामासाठी महत्तम निधी मर्यादा ५ लक्ष (सर्व करांसहीत) निश्चित करण्यात आली आहे. त्यास अधिन राहून आपला आर्थिक प्रस्ताव सादर करावा.
- **देयके खालील ४ टप्प्यांत अदा केली जातील:**
  - **टप्पा १:** प्रारंभिक अहवाल (Inception Report) व गरज मूल्यांकन (Need Assessment) अहवाल मंजुरीनंतर. २५ टक्के
  - **टप्पा २:** मराठी प्रारूप मसुदा (Draft IEC Booklet) मंजुरीनंतर. २५ टक्के
  - **टप्पा ३:** सुधारित अंतिम मसुदास (Validated Final Manual) मंजुरी मिळाल्यानंतर. २५ टक्के
  - **टप्पा ४:** Digital e-Book व सर्व रॉ फाइल्स (Raw files) सादर केल्यानंतर. २५ टक्के

५. गोपनीयतेची अट व बौद्धिक संपदा हक्क (Confidentiality & IPR)

- मॅन्युअल तयार करताना सल्लागाराला मिळालेली संस्थेची माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवावी लागेल.
- तयार केलेले आयईसी मॅन्युअल (IEC Manual) ही पूर्णपणे संस्थेची मालमत्ता असेल व सर्व कॉपीराईट्स संस्थेकडे राहतील.

६. प्रस्ताव सादरीकरण (Proposal Submission) सदर कामासाठी वैयक्तिक तज्ञ सल्लागारांनी आपले **१. तांत्रिक प्रस्ताव (Technical Proposal - CV सह)** आणि **२. वित्तीय प्रस्ताव (Financial Proposal)** ईमेलद्वारे (ceo@villagetransformation.org) दिनांक **२५ नोव्हेंबर २०२६** संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

(डॉ. उमाकांत दांगट)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन, मुंबई

सहपत्र :
१. सविस्तर कार्यकक्षा (Terms of Reference - ToR)
२. तांत्रिक प्रस्ताव नमुना
३. वित्तीय प्रस्ताव नमुना (Fixed Cost Framework)
४. तांत्रिक मूल्यमापन तक्ता

समुदाय आधारित संस्थांच्या बळकटीकरणासाठी माहिती, शिक्षण आणि संवाद (IEC) साहित्य व क्षमता बांधणी पुस्तिका निर्मिती करणे

कार्यकक्षा

TERMS OF REFERENCE (ToR)

प्रकल्प नाव	आकांक्षित व शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये 'ग्रामीण उपजीविका बळकटीकरण' प्रकल्प
अंमलबजावणी संस्था	ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन
लक्ष्य क्षेत्र व संस्था	४ **जिल्हे** – सोलापूर, लातूर,गडचिरोली, धाराशीव **१० तालुके** – सोलापूर – उत्तर सोलापुर, दक्षिण सोलापूर, मोहोळ व माढा लातूर – अहमदपूर, औसा, जळकोट गडचिरोली –गडचिरोली व आरमोरी धाराशीव– तुळजापुर ३० समुदाय आधारित संस्था (CBOs)
संदर्भ	मार्गदर्शक सूचना – आकांक्षित व शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण प्रकल्प(अवजार बँक) दिनांक १८/०८/२०२६
कार्य स्वरुप	समुदाय आधारित संस्थांच्या बळकटीकरणासाठी, माहिती, प्रशिक्षण आणि संवाद साहित्य व क्षमता बांधणी पुस्तिका (IEC Material & Manuals) निर्मिती करणे.
निवड प्रकिया पद्धती	सदर कामासाठी, वैयक्तिक तज्ञ सल्लागाराची निवड निविदा प्रक्रिये द्वारे करण्यात येईल.

प्रस्तावना:

ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन च्या माध्यमातून, **"आकांक्षित आणि आत्महत्याप्रवण जिल्ह्यांमध्ये ग्रामीण उपजीविका बळकटीकरण"** हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत, सोलापूर जिल्ह्यातील, उत्तर सोलापुर, दक्षिण सोलापूर, मोहोळ व माढा हे तालुके, लातूर जिल्ह्यातील अहमदपुर, औसा, जळकोट हे तालुके, गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली व आरमोरी हे तालुके व धाराशीव जिल्ह्यातील तुळजापुर अशा १० तालुक्यांचा समावेश आहे. या निवडक १० तालुक्यातील प्रति तालुका ३ या प्रमाणे, शेतकरी उत्पादक कंपन्या/FPC, बचत गट/SHG, ग्राम संस्था/VO, क्लस्टर लेव्हल फेडरेशन/CLF अशा विविध प्रकारातील, एकूण ३० समुदाय आधारित संस्थांची निवड करुन त्यांना अवजार बँकेसाठीचे साहित्य उपलब्ध करुन देणे व विविध प्रशिक्षणांच्या माध्यमातून या संस्थांना शाश्वत सेवा पुरवठादार म्हणून विकसित करावयाचे आहे.

निवड झालेल्या संस्थांना शाश्वत सेवा पुरवठादार म्हणून विकसित करणे कामी, त्यांच्या संचालकांना / कार्यकारी समितीला संस्थात्मक प्रशासन, वित्तीय लेखे तयार करणे आणि वैधानिक बाबींची पूर्तता करणे यासाठीचे व्यावहारिक ज्ञान मिळणे आवश्यक आहे. या संस्थांचे संचालक मंडळ / कार्यकारी समिती व इतर सदस्य यांच्या क्षमता बळकटीकरणासाठी सुलभ, सोप्या भाषेत व्यावहारिक असे, "मार्गदर्शक माहिती, प्रशिक्षण आणि संवाद साहित्य" (IEC Material) तयार करावयाचे आहे.

निवड झालेल्या संस्थांबरोबरच, तयार होणारे "मार्गदर्शक माहिती, प्रशिक्षण आणि संवाद साहित्य" हे इतर शेतकरी उत्पादक कंपन्या/FPC, बचत गट/SHG, ग्राम संस्था/VO, क्लस्टर लेव्हल फेडरेशन/CLF अशा विविध प्रकारातील सर्वच समुदाय आधारित संस्थांना वापरता येऊ शकेल असे व्यापक स्वरुपातील बनावे असे अपेक्षित आहे.

उद्दिष्ट –

या कामासाठीची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत –

१) शेतकरी उत्पादक कंपन्या/FPC, बचत गट/SHG, ग्राम संस्था/VO, क्लस्टर लेव्हल फेडरेशन/CLF अशा विविध प्रकारच्या संस्था यांची स्थापना व नोंदणी प्रक्रिया संदर्भात प्रक्रियेचे मार्गदर्शन.

२) शेतकरी उत्पादक कंपन्या/FPC, बचत गट/SHG, ग्राम संस्था/VO, क्लस्टर लेव्हल फेडरेशन/CLF अशा विविध प्रकारच्या समुदाय आधारित संस्थांच्या (CBOs) संचालकांसाठी व सदस्यांसाठी, संस्था प्रकार लक्षात घेऊन, वैधानिक, प्रशासकीय आणि आर्थिक नोंदी ठेवण्याबाबत चे मार्गदर्शन.

३) प्रकल्पांतर्गत संस्थांकडून त्यांच्या चालत असलेल्या विविध उपक्रमांना अधिक कार्यक्षम पद्धतीने चालविणे व व्यावसायिक संचालन करणे यासाठी मार्गदर्शक कार्यपद्धती (SOPs) विकसित करणे.

४) शासकीय योजनांचा कृतीसंगम साधण्यासाठी आवश्यक असणारे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत विविध नमून्यांसह मार्गदर्शन उपलब्ध करून देणे.

५) राज्य व केंद्र शासनाच्या विविध उपजीविका व कृषी योजनांची सविस्तर माहिती आणि डिजिटल दुवे (Links) यांचे एकत्रित संकलन करणे.

वरील सर्व बाबींचा समावेश करुन सुलभ मराठी भाषेत, सहज वाचता येण्यासारख्या व सोबत बाळगता येऊ शकेल अशा मार्गदर्शन पुस्तिकेच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे जेणे

करुन समुदाय आधारित संस्थांना विविध पातळ्यांवर भासणा–या अडचणींवर मात करण्यासाठी मार्गदर्शन उपलब्ध होऊ शकेल व समुदाय आधारित संस्थांना सर्व पातळ्यांवर बळकट व्हायला मदत होईल.

कामाची व्याप्ती

माहिती पुस्तिकेत समाविष्ट करावयाचे अपेक्षित घटक –

घटक १: संस्थात्मक प्रशासन, वैधानिक व आर्थिक बाबी (Governance & Financial and Legal Compliances)

शेतकरी उत्पादक कंपन्या/FPC, बचत गट/SHG, ग्राम संस्था/VO, क्लस्टर लेव्हल फेडरेशन/CLF अशा विविध संस्थांच्या संचालकांसाठी संस्थांच्या प्रकारानुसार आवश्यक असणा–या वैधानिक व प्रशासकीय जबाबदा–यांची सोप्या भाषेतील माहिती.

- **संस्थात्मक दस्ताऐवजीकरण**: शेतकरी उत्पादक कंपन्या/FPC, बचत गट/SHG, ग्राम संस्था/VO, क्लस्टर लेव्हल फेडरेशन/CLF अशा विविध प्रकारातील संस्थांनी ठेवायाचे महत्त्वाचे दस्तावेज व दप्तरे यांचे (रजिस्टर्स, इतिवृत्त पुस्तक, सभासद नोंदणी) नमुने व ते ठेवायची कार्यपद्धती.
- **आर्थिक बाबींची पूर्तता:** जमा–खर्च नोंदी, पुस्तकपालन (Bookkeeping), वस्तू व सेवा कर (GST), उत्पन्न कर (Income Tax), आर्थिक ताळेबंद (Balance Sheet) व वार्षिक लेखापरीक्षण (Audit) बाबत व्यवहारिक माहिती व ते जतन करण्याची कार्यपद्धती.
- **वैधानिक बाबींची पूर्तता:** समुदाय आधारित संस्थांना कृषी आधारित तसेच अकृषीक अशा दोन्ही प्रकारच्या व्यवसायांसाठी लागाणा–या विविध प्रकारच्या प्रमाणपत्रांची वर्गनुरुप यादी व ते प्राप्त करण्यासाठीची कार्यपद्धती.

घटक २: व्यवसाय मार्गदर्शन

- समुदाय आधारित संस्थेच्या माध्यमातून चालू असलेल्या व्यवसायाचे "व्यावसायिक व्यवस्थापन, सेवा पुरवठादार संस्थेसाठी भाडेदर आकारणी व यंत्रसामग्रीची देखभाल दुरुस्ती नियमावली, बाजार जोडणीची (मार्केट लिंकेज) कार्यपद्धती, मूल्य वर्धन (व्हॅल्यू ॲडिशन) संदर्भात मार्गदर्शन इ.

घटक ३:शासकीय योजना व दुवे संकलन

राज्य व केंद्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, व ग्रामीण उपजीविका योजनांची माहिती. योजनांचे अर्ज नमुने, पात्रता निकष आणि थेट ऑनलाईन अर्जासाठीचे आवश्यक क्यूआर कोड (QR Codes) व वेब दुवे.

घटक ४: प्रशिक्षण घेण्यासाठी पद्धती मार्गदर्शक

वर नमूद सर्व बाबींचे प्रशिक्षण घेण्यासाठीची वापरायची पद्धत व दिवस /तास वार नियोजन वेळापत्रक

साहित्य निर्मितीचे टप्पे व कार्यपद्धती

IEC माहिती पुस्तिका तयार करताना संस्थेने खालील टप्प्यांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असेल:

टप्पा क्र.	कार्याचे नाव	तपशील
१	या पुर्वी उपलब्ध असलेल्या साहित्याचा आढावा व संशोधन	यापूर्वी उपलब्ध असलेल्या कृषी व समुदाय आधारित संस्था विषयक साहित्याचा अभ्यास करणे.
२	गरज मूल्यांकन (Need assessment)	क्षेत्रीय भेटीच्या माध्यमातून, समुदाय आधारित संस्थांच्या गरजांचे मूल्यांकन करणे. त्यासाठी निवडक संस्था संचालक, संस्था सदस्य व प्रशासकिय अधिकारी यांच्याशी चर्चा करणे.
३	प्रारूप रचना	मराठी भाषेत सोप्या व चित्रमय स्वरूपात माहिती पुस्तिकेचा मसुदा तयार करणे.
४	वापरकर्त्यांची स्विकृती	अंतिम वापरकर्ते (CBO संचालक/क्षेत्रीय अधिकारी) यांच्याकडून अभिप्रायाची पडताळणी.
५	अंतिम रूप देणे	प्राप्त सुचनांनुसार आवश्यक बदल करून पुस्तिकेला अंतिम रुप देणे व त्यास ग्रा.सा.प.फाउंडेशन ची मंजुरी प्राप्त करुन घेणे.
६	तयार होणारे साहित्य डिजिटल स्वरुपात ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन यांस सादर करणे	तयार होणारे साहित्य त्याच्या सर्व रॉ फ़ाईल्स सह ई-बुक/डिजिटल फॉरमॅट मध्ये ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन ला उपलब्ध करुन देणे.

देय बाबी व कालमर्यादा

संस्थेने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत खालील देय बाबी (Deliverables) ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन कडे सादर करणे आवश्यक असेल:

क्र.	देय बाबी (Deliverables)	अपेक्षित कालमर्यादा (Timeline)
१	प्रारंभिक अहवाल, गरज मूल्यांकन अहवाल व सविस्तर कृती आराखडा (Inception Report, Need assessment report and Detailed Workplan)	कार्यारंभ आदेशानंतर ४ आठवड्यात

२	मराठी प्रारूप मसुदा (Draft IEC Booklet)	कार्यारंभ आदेशानंतर ५ आठवड्यात
३	सुधारित अंतिम मसुदा (Validated Final Manual)	कार्यारंभ आदेशानंतर ६ आठवड्यात
४	Digital e-Book File (with all raw files)	कार्यारंभ आदेशानंतर ७ आठवड्यात

वैयक्तिक तज्ञ सल्लागाराची निवड प्रक्रिया –

१) दर पत्रक सादर करणा–या तज्ञ सल्लागारास ग्रामीण विकास, कृषी, FPO/CBO क्षमता बांधणी व IEC साहित्य निर्मितीचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा.

२) मराठी भाषेत सुलभ व उच्च दर्जाचे प्रशिक्षण साहित्य व पुस्तके तयार करण्याची क्षमता असावी.

३) या कामाची (Deliverables) प्रदेये (माहिती, शिक्षण आणि संवाद (IEC) साहित्य व क्षमता बांधणी पुस्तिका निर्मिती करणे) आणि कालमर्यादा निश्चित असून दिलेल्या कालमर्यादेत काम पूर्ण करण्याची क्षमता असावी.

४) यापूर्वी यशस्वीरीत्या राबवलेल्या तत्सम IEC सामग्री/पुस्तिका निर्मिती प्रकल्पांची माहिती सादर करावयाच्या प्रस्तावामध्ये समाविष्ट करावी.

१. तांत्रिक प्रस्ताव मसुदा (Technical Proposal Framework)

विभाग १: वैयक्तिक तज्ञ सल्लागाराची पात्रता व अनुभव

- **क्षेत्रीय अनुभव:** तज्ञ सल्लागारास ग्रामीण विकास, कृषी, FPO/CBO क्षमता बांधणी आणि माहिती, शिक्षण व संवाद (IEC) साहित्य निर्मितीचा किमान ५ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे.
- **प्रकल्पांचे दस्तऐवजीकरण:** तज्ञ सल्लागाराने यापूर्वी यशस्वीरीत्या राबवलेल्या तत्सम IEC सामग्री/पुस्तिका निर्मिती प्रकल्पांची माहिती प्रस्तावामध्ये समाविष्ट करावी.

विभाग २: कार्यपद्धती व नियोजन (Approach, Methodology & Work Plan)

- **क्षेत्रीय व्याप्ती व गरज मूल्यांकन:** गडचिरोली, लातूर, सोलापूर व धाराशीव या ४ जिल्ह्यांतील १० तालुक्यांमधील ३० समुदाय आधारित संस्थांच्या (CBOs – FPC, SHG, VO, CLF) गरजांचे मूल्यांकन करण्यासाठी क्षेत्रीय भेटी व भागधारकांशी चर्चा आयोजित केली जाईल.
- **पुस्तिकेची विषयरचना:** ToR च्या निकषांनुसार मार्गदर्शक माहितीत खालील ३ मुख्य घटकांचे संकलन केले जाईल:
  १) *संस्थात्मक प्रशासन, वैधानिक व आर्थिक बाबी:* संस्था प्रकारानुसार दप्तरे, इतिवृत्त पुस्तके, बुककीपिंग, GST, Income Tax, ताळेबंद, वैधानिक परवाने व ऑडिट मार्गदर्शन.
  २) *व्यावसायिक व्यवस्थापन:* अवजार बँक भाडेदर आकारणी, यंत्रसामग्री देखभाल नियमावली व मार्केट लिंकेज कार्यपद्धती (SOPs).
  ३) *शासकीय योजना संकलन:* केंद्र व राज्य सरकारच्या कृषी व उपजीविका योजनांची माहिती, अर्ज नमुने व थेट ऑनलाईन अर्जासाठी क्यूआर कोड (QR Codes)/वेब दुवे संकलन.
- **निर्मितीचे ६ टप्पे:** कामाची अंमलबजावणी ही उपलब्ध साहित्याचा आढावा, गरज मूल्यांकन, सुलभ व चित्रमय मराठीत प्रारूप रचना, वापरकर्त्यांची स्विकृती/पडताळणी, सुधारणा आणि अंतिम ई-बुक सादरीकरण या ६ टप्प्यांत केली जाईल.

विभाग ३: तज्ज्ञ कार्यबळ (Expert Consultant CV)

- **भाषा व लेखन कौशल्य:** सुलभ व सोप्या मराठी भाषेत उच्च दर्जाचे प्रशिक्षण साहित्य व मार्गदर्शक पुस्तके तयार करण्याचे कौशल्य असावे.
- **मानकीकृत CV:** अर्ज सादर करणा-या तज्ञ सल्लागाराने त्यांचा बायोडाटा (CV) जोडावा.

विभाग ४: देय बाबी आणि कालमर्यादा (Deliverables & Timelines)

- **७ आठवड्यांचे वेळापत्रक:** संपूर्ण काम ७ आठवड्यांच्या कालमर्यादेत खालील Deliverables नुसार पूर्ण केले जाईल:
  - *४ आठवडे:* Inception Report, Need Assessment Report व सविस्तर कार्य आराखडा.
  - *५ आठवडे:* मराठी प्रारूप मसुदा (Draft IEC Booklet).
  - *६ आठवडे:* सुधारित अंतिम मसुदा (Validated Final Manual).
  - *७ आठवडे:* Digital e-Book आणि सर्व Raw Files सादरीकरण

२. वित्तीय प्रस्ताव मसुदा (Financial / Cost Proposal Framework)

- **प्रस्तावाचे स्वरूप:** संपूर्ण कामासाठी एकरकमी निश्चित किंमत (Fixed Price / Lump-sum Cost) वित्तीय प्रस्तावात नमूद केली जाईल.
- **देयक टप्पे (Payment Milestones):** देयके ही Deliverables च्या मंजुरीनुसार टप्प्याटप्प्याने अदा केली जातील:
  - *टप्पा १:* Inception Report व Need Assessment अहवाल मंजुरीनंतर.
  - *टप्पा २:* मराठी प्रारूप मसुदा (Draft Booklet) मंजुरीनंतर.
  - *टप्पा ३:* सुधारित अंतिम मसुदास मंजुरी मिळाल्यानंतर.
  - *टप्पा ४:* Digital e-Book व सर्व रॉ फाइल्स सादर केल्यानंतर.
- **कर व प्रवास खर्च:** वित्तीय प्रस्तावातील दरांमध्ये शासकीय कर (Taxes) आणि नियमानुसार प्रवास/मुक्काम खर्च (Out of Pocket Expenses) वेगळे दर्शवले जातील.

३. तांत्रिक मूल्यमापन तक्ता

तज्ञ सल्लागाराच्या निवडीसाठी १०० गुणांचा तांत्रिक मूल्यमापन तक्ता खालीलप्रमाणे तयार केला जाईल:

अ.क्र.	मूल्यमापनाचा निकष (Evaluation Criteria)	गुण (Marks)	मूल्यमापनाचा आधार (Basis of Evaluation)
१	तज्ञाचा अनुभव व क्षमता	२५	CBO/FPO क्षमता बांधणी व IEC साहित्य निर्मितीचा ५+ वर्षांचा अनुभव.
२	कार्यपद्धती व तांत्रिक नियोजन	३५	ToR मधील ६ टप्प्यांचे अचूक नियोजन, सोप्या व चित्रमय मराठी पुस्तिकेचा आराखडा आणि ३ मुख्य घटकांची मांडणी.
३	तज्ज्ञ मनुष्यबळाची गुणवत्ता	३०	तज्ञ सल्लागाराची शैक्षणिक पात्रता, मराठी भाषेतील लेखन कौशल्य व अनुभव.
४	सादरीकरण (Presentation)	१०	प्रकल्पाची समज, कार्यकक्षेचे स्पष्टीकरण आणि समितीपुढील तांत्रिक सादरीकरण.
	एकूण तांत्रिक गुण (Total Marks)	१००	

- **अंतिम निवड पद्धत:** तांत्रिक मूल्यांकनात ठरवून दिलेला कट-ऑफ पार करणा-या तज्ञ सल्लागाराचे वित्तीय प्रस्ताव उघडले जातील. तांत्रिक गुण व वित्तीय प्रस्तावातील गुणांना ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार एकत्रित करून सर्वोत्तम गुण मिळवणा-या तज्ञ सल्लागारास कार्यादेश दिला जाईल.